दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२५ वा मंगळवार दि.२२ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## अमित देशमुखांच्या बालेकिल्ल्याला भाजपनं घेरलं? इच्छुकांच्या रांगा! तिरंगी लढत होणार!







लातूर :- राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच, लातूर शहर विधानसभेच राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. सर्वच राजकीय पक्ष्यांच्या हालचालींना वेग आलाय. चौथ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या अमित देशमुख यांना, यावेळी वंचित, भाजपाकडून तगड आव्हान देण्याची तयारी आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांनी याच मतदारसंघातून सलग ५ वेळा प्रतिनिधित्व केले आहे. विलासराव देशमुख यांच्या निधनानंतर, त्यांचे चिरंजीव अमित देशमुख, गेल्या ३ टर्मपासून लातूर शहर विधानसभेच प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे या मतदार संघावर काँग्रेसची पकड मजबूत आहे. मात्र असं असताना यावेळी, वंचितने विनोद खटके तर भाजपाकडून अमित देशमुख यांना तगड आव्हान देण्यासाठी, योग्य उमेदवार उभा करण्याची तयारी सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपनं काँग्रेसचं घर फोडत काँग्रेसचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनेला भाजपा त प्रवेश दिला. त्यामुळे डॉ.अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नावाची देखील चर्चा सुरू आहे. पक्षाने संधी दिल्यास मोठ्या ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याच डॉ. अर्चना पाटील चाकूरकर सांगत आहेत. ३ लाख ९८ हजार ३०० मतदार संख्या असलेल्या लातूर शहर मतदार संघात यंदाही तिरंगी लढत होणार आहे. मात्र असं असलं तरी २०१९ विधानसभा निवडणुकीत लातूर शहरात काँग्रेसचे अमित देशमुख यांना १ लाख ११ हजार १५६, भाजपचे शैलेश लाहोटी यांना ७० हजार ७४१, तर वंचित बहुजन आघाडीचे राजा मनियार यांना २४ हजार ६०४ मतं मिळाली होती. भाजपचा उमेदवार फायनल नाही २०१९ च्या विधानसभा निवडणुकी लातूर शहर विधानसभेत देखील तिरंगी लढत झाली होती. मात्र यावेळी वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार विनोद खटके यांचा लातूर जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रकारे प्रभाव असल्यामुळे सर्व समाजात त्यांचा संपर्क आहे. त्यामुळे थेट काँग्रेसविरुद्ध भाजप, अशीच लढत झाली होती. या लढतीत अमित देशमुख यांनी तिसऱ्यांदा ४० हजार ४१५ मतांची आघाडी घेत विजय मिळवला होता. मात्र या वेळेला भाजपकडून डॉ. अर्चना पाटील चाकूरकरांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे भाजपचा उमेदवार जरी आता फायनल झाला नसला, तरी यावेळीस लातूर शहर विधानसभेची निवडणूक ही अमित देशमुख यांना डोकेदुखी ठरणार आहे. परंतु काँग्रेससाठी प्रतिष्ठेशी आणि चुरशीची राहणार आहे.

## थकबाकीधारकावर मनपाची धडक कार्यवाही.. ६ दुकान गाळे, १ कार्यालय सील

**कर वसुली साठी मनपा आक्रमक.. जप्ती सोबतच नळ खंडन, प्लॉट अटकावणी मोहीम अधिक तीव्र होणार**

लातूर/ प्रतिनिधी :- मालमत्ता कर हाच लातूर महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्या दृष्टीने सालसन २०२४-२५ वर्षात मनपा तर्फे थकित मालमत्ताधाकराच्या वसुलीसाठी मागील ८ दिवसापासून धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे . आज दि.२१.१०.२०२४ रोजी एकूण ०६ वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करण्यात आली तसेच १ स्वयंसेवी संस्थेचे कार्यालय सील करण्यात आले.. थकीत मालमत्ता धारकाकडे पथक पोचताच ०८ मालमत्ता धारकणी १५ लाख चे धनादेश देऊन कर भरणा केला आहे या आठवड्यात थकीत कर वसूलीसाठी मालमत्ता जप्ती सोबतच, नळ खंडन, खुले प्लॉट अटकावणी सारखी धडक कार्यवाही करण्यात येणार असून थकबाकीधारकाणी आपल्याककडील थकीत





वसुली मोहिम राबविण्यात येत आहे, ज्याअंतर्गत नागरिकांना वेळोवेळी कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. चालू वर्षात आतापर्यंत ३० हजार मालमत्ता धरकानी ४० कोटी कराचा भरणा करून मनपास सहकार्य केले.

परंतु, काही मालमत्ताधारकाकडे मोठा कर थकीत आहे. थकबाकिदार यांना थकीत रकमेवर दरमहा २% व्याज सुद्धा लागत आहे. थकीत मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबत वेळोवेळी मागणी बीले, नोटीस देऊनही कराचा भरणा न केल्याने क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी, अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. जप्तीसारखी होणारी कटू कार्यवाही टाळावी व मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी नागरिकांना केले आहे.

# लोकसभा निवडणुकीप्रमाणेच काँग्रेस महाविकास आघाडी एकजुटीने विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार

लातूर /प्रतिनीधी :- लोकसभा निवडणुकीप्रमाणेच काँग्रेस महाविकास आघाडी एकजुटीने विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहे, राज्यात परिवर्तन घडवून, महाराष्ट्र विधानसभेवर आघाडीचा झेंडा फडकवणार आहे, असा विश्वास याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक यांच्याशी संवाद साधताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी लातूर शहरातील प्रभाग ३ मधील राजीव नगर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे लातूर शहर जिल्हाप्रमुख सुनीलजी बसपुरे यांच्या निवासस्थानी भेट दिली यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांच्या लातूर शहरातील शारदा नगर येथील जनसंपर्क कार्यालयाला भेट देऊन त्यांच्याशी लातूर शहर विधानसभा निवडणुकीतील विविध विषयावर चर्चा केली यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विष्णुपंत साठे, बालाजी जाधव, माधव गलमुगळे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेवक सचिन बंडापल्ले, विजयकुमार साबदे, वर्षा मस्के, प्रवीण सूर्यवंशी, व्यंकटेश पुरी, शिवाजी बसपुरे, इम्रान सय्यद, मोहन सुरवसे, यशपाल कांबळे, पद्माकर पेंढारकर, राजू गवळी, तनुजा कांबळे, राहुल डुमणे आदिसह काँग्रेस महाविकास आघाडीतील आजी, माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते बसपुरे कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली यावेळी माजी महापौर दीपक सुळ, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, चांदपाशा इनामदार, माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरकर, सत्तार शेख, शेखर हविले, प्रवीण साळुंके, युनूस मोमीन, रत्नदीप अजनीकर, फैसलाखान कायमखानी, रघुनाथ मदने, असरेश्वर शितोळे, बसवेश्वर रेकुळगे, इरफान शेख, ड. प्रदीप पाटील, अनिता साळुंके, कल्पना फरकांडे, विनायक शिंदे, उमाकांत नाईकनवरे, सरिता पाटील, युवराज बन, खाजा मणियार, मनीषा कोकणे, प्रवीण सूर्यवंशी, व्यंकटेश पुरी, इम्रान सय्यद, रत्नदीप अजनीकर, पवन सोलंकर, विजय टाकेकर आदिसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महाविकास आघाडीतील आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते मणियार कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते. प्रभाग क्रमांक तीन मधील नागरिकांशी संवाद साधताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका आता सुरू झाल्या आहेत. लातूरला मराठवाड्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे, लातूर ही मराठवाड्याची शान आहे. लातूरकर म्हणून आपली सर्वांची जबाबदारी आहे, महाराष्ट्राला एक कणखर सरकार द्यायचे औपचारिक प्रचाराला आम्ही आज सुरुवात केली आहे. लातूरचा सूर्योदय हा पूर्वीकडून होत आहे म्हणून लातूर महाविकास आघाडीने पूर्व भागातून श्री सुनील बसपुरे निवासस्थानी भेट देऊन महाविकास आघाडीच्या प्रचाराला सुरुवात केली आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महायुती सरकार मधील भ्रष्टाचार महागाई बेकारी यापासून सामान्य माणूसाला आपणला मुक्त करायचे आहे. महाराष्ट्र हा दिल्ली समोर आता झुकणार नाही,





महाराष्ट्र धर्मासाठी आपण सर्वजण एकत्र येऊन लढा उभा करूया. लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी सव्वा दोन हजार कोटीचा निधी आम्ही खेचून आणला आपले मत अमूल्य आहे ते वाया जाऊ नये म्हणून काळजी घ्या, अनेक राजकीय पक्ष येतील खोटेनाटे आरोप करतील ते सर्व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी खोडून काढावे, अफवा भुलथापाना बळी पडू नका, आम्ही आपली प्रामाणिकपणे सेवा करण्याचे काम केले आहे. लातूरतील गुन्हेगारी संपुष्टात आणायची आहे, सावकारी पण संपुष्टात आणायची आहे, लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूरला आपलं घर मानलं तसेच लातूरकरांनी त्यांना कुटुंबप्रमुख मानलं त्याप्रमाणे लातूर हे माझं घर आहे सर्वधर्मसमभावाची भूमिका काँग्रेस पक्षाने कायम निभावली आहे असे सांगून त्यांनी महाविकास आघाडीला साथ देण्याचे आवाहन केले. यानंतर राजा मणियार यांच्या लातूर शहरातील शारदा नगर येथील जनसंपर्क कार्यालयाला भेट दिली यावेळी बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर शहरात महाविकास आघाडी एकजुटीने विधानसभा निवडणूक लढवत आहे. महाराष्ट्रात आपणाला परिवर्तन घडवायचे आहे. लोकसभा निवडणूक इंडिया अलायन्स म्हणून आम्ही लढलो. आता विधानसभा निवडणूक आम्ही महाविकास आघाडी म्हणून लढत आहोत. लातूरला आपणाला खूप पुढे घेऊन जायचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा असली पक्ष आहे. हे जनतेने लोकसभा निवडणुकीत दाखवून दिले. त्याप्रमाणेच ते विधानसभा निवडणुकीतही दाखवून देतील. असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की आपण लातूरकर म्हणून लातूर साठी झटत असतो लातूरच्या किल्लारी येथील भूकंपात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी खूप मदत केली. लातूरला मुख्यमंत्रीपद लोकनेते विलासराव देशमुख यांना जे मिळाले ते शरदचंद्र पवार यांच्या सहकार्यमुळेच मिळाले. महाविकास आघाडी ही पाच वर्षासाठी नसून ती पुढील पाच २५ वर्षासाठी आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वात आपणाला विधानसभेची निवडणूक जिंकायची आहे. मी लातूर जिल्ह्याचा तत्कालीन पालकमंत्री असताना महाविकास आघाडीला जिल्ह्यात अधिक सन्मान दिला. यापुढेही महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्याला समान न्याय मिळेल असे ते म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, लातूर महानगरप्रमुख सुनील बसपुरे यांनी मनोगत व्यक्त करून आम्ही सर्वजण महाविकास आघाडीचा धर्म पाळू लातूर शहराला सुरक्षित ठेवण्याचे काम लोकनेते विलासराव देशमुख यांनी केले तीच परंपरा माजी मंत्री आमदार अमित देशमुख पुढे चालवत आहेत त्यांना या मतदारसंघातून एक लाखाची लीड मिळेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

## भाजपाचे राजकिरण साठे यांना पितृशोक आ.रमेशआप्पा कराड यांच्याकडून सांत्वन



लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा सर्कल मध्ये असलेल्या मौजे टाका येथील भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राजकिरण साठे यांचे वडील माणिकराव शाहूराज साठे यांचे नुकतेच दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी औसा तालुक्यातील मौजे टाका येथील साठे यांच्या निवासस्थानी रविवारी दुपारी भेट देऊन सांत्वन केले. आ. रमेशआप्पा कराड यांनी अस्थेवाईकपणे चर्चा करून राजकिरण साठे यांचे सांत्वन केले. यावेळी साठे परिवारातील किशनराव साठे, पंकज साठे, उत्तमराव सावंत, महादेव शिंदे, जितेंद्र पाटील, बालाजी साठे यांच्यासह इतर अनेक जण होते

याप्रसंगी आ. कराड यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, प्रदेश भाजपाचे पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, साहेबराव मुळे, गोपाळ पाटील, भैरवनाथ पिसाळ, उमेश बेद्रे, अँड. मनोज कराड, रवींद्र पाटील त्याचबरोबर टाका येथील व्हाईस चेअरमन ज्योतिबा गोरे, उपसरपंच भीमाशंकर स्वामी, दाजीबा देवशिंगेकर, धनराज गिरी, समाधान जोगी, राहुल लोखंडे, संदीपान शेळके, व्यंकट भुसारे, बसवंत बिडवे, दाजी पाटील, तुकाराम सुर्यवंशी निरंजन गुरव, राम पेठकर, तानाजी सावंत, गौतम मोरे यांच्यासह अनेक जण होते.

## काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची आमदार धिरज देशमुख यांनी घेतली सदिच्छा भेट



लातूर / प्रतिनिधी :- अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री. मल्लिकार्जुन खर्गे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शनिवार, दि. १९ रोजी बंगळुरु येथे भेट घेतली. श्री. मल्लिकार्जुन खर्गे यांची आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी भेट घेवून त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी श्री. खर्गे यांच्याशी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी राज्यातील विविध विषयांवर चर्चा केली. आगामी विधानसभा निवडणुकीबाबतही यावेळी चर्चा झाली.

## अंकोलीतील अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा आमदार धिरज देशमुख यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश



लातूर/प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण मतदारसंघातील अंकोली (ता. लातूर) येथील उपसरपंच श्री. सुधाकर गवळी, श्री. बाळकृष्ण उर्फ विकास मुळे, श्री. गणेश गवळी यांच्यासह त्यांचे सहकारी, कार्यकर्ते यांनी लातूर येथे लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत (रविवारी, दि. २० रोजी) काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार धिरज देशमुख यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी विजय देशमुख, सर्जेराव मोरे, किरण जाधव, जगदीश बावणे, रविंद्र काळे, शाम भोसले, संतोष देशमुख, सुभाष घोडके, प्रमोद जाधव, अनंतराव देशमुख, उमाकांत खलंग्रे, गुरुनाथ गवळी, अनुप शेळके, गोविंद बोराडे, राजेसाहेब सवई, मदन भिसे, युवराज जाधव, सचिन दाताळ, प्रताप पडिले, श्रीनिवास शेळके, तुकाराम गोडसे पाटील, महेंद्र भादेकर, कैलास पाटील, रघुनाथ शिंदे, संजय गवळी, महेंद्र मुळे, दीपक गवळी, मदन नागमोडे, विशाल चव्हाण आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# आम्ही अडगेची राहू.

यात जितका दोष व्यवस्थेचा तितकाच शैक्षणिक व्याख्याने झोडणाऱ्या, पुस्तकांच्या कंत्राटावर डोळा असणाऱ्या, सरकारी समित्यांमध्ये मान मिळवणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांचाही गेले तीन दिवस 'लोकसत्ता'ने अभ्यासक्रम बदलाच्या प्रस्तावाबाबत विस्तृत वृत्तांत प्रसृत केले. निवडणुकीच्या साठमारीत मग्न असलेल्या राज्यातील राजकीय पक्षांस त्यावर भाष्य करण्यास वेळ नाही. तथापि हा विषय राजकारण्यांवर सोडून 'हलक्यात घ्यावा' (हे नवे 'हिंदा'ळलेले मराठी) असा नसल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते. याचे कारण नवा, आदर्श, संस्कारक्षम अभ्यासक्रम राज्यभर लागू करण्याचे श्रेय घेण्याच्या नादात आचारसंहितेच्या आदल्या दिवशी नव्या अभ्यासक्रम आराखड्याचा अंतिम मसुदा जाहीर करण्यात आला. सरकारच्या लेखी महामंडळांवर कोणाची तरी वर्णी लावणे आणि पुढची पिढी घडवेल/बिघडवेल असा अभ्यासक्रम या दोन्हींचे मोल एकच! हा नवा मसुदा पाहिल्यास सक्षम मनुष्यबळाच्या रूपाने या देशाची 'नालंदा'पासूनची शैक्षणिक परंपरा पुढे जाण्याऐवजी शिक्षण विभागाने मुखभंगाची परंपरा राखल्याचा विश्वास नक्की मिळतो. अभ्यासक्रम आराखडा हा खरे तर अत्यंत शिस्तबद्ध, नेमका आणि देशाची, जगाची भविष्याची गरज लक्षात घेऊन रचलेला दस्तावेज असणे अपेक्षित आहे. मात्र, या तीनही मुद्द्यांचा अभाव या आराखड्यात दिसतो. अभ्यासक्रमात काय असावे, मुलांना नेमके काय शिकवावे, त्याचा स्तर कोणता असावा, त्यातून काय साध्य होणे अपेक्षित आहे, त्याबरहुकूम अभ्यास साहित्य कसे निर्माण करावे या मूलभूत बाबी तोंडी लावण्यापुरत्या आणि फुकाची बौद्धिके या आराखड्यात सढळ आहेत. हिऱ्याच्या अपेक्षेने एखादे आकर्षक वेष्टन उघडावे आणि आत गारगोटी असावी तसेच हे. या देशातील, जगातील यापूर्वीच्या शिक्षण धोरणकर्त्यांनी तयार केलेली रचना मोडीत काढण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून देशभरात नवे शिक्षण धोरण लागू करण्यात आले. आपल्या परिसरात बोलली, वाचली जाणारी भाषा, जगात सर्वाधिक पातळीवर मान्यता पावलेली इंग्रजी भाषा आणि अजून एखाद्या स्थळ, काळातील ज्ञानाची कवाडे खुली व्हावीत यासाठी तिसरी एखादी अतिरिक्त भाषा अशी भाषा रचना, जगण्यासाठी अत्यावश्यक असणारी आकडेमोड शिकवणारे, तर्कसुसंगत विचार, प्रश्न सोडवण्याची कुवत निर्माण करणारे गणित, भोवतालच्या घटनांची सुसंगती लावून त्याचे मूळ शोधण्यासाठी प्रवृत्त करणारे विज्ञान, भोवताल, तेथील परिस्थिती, हवा, माती यांचे भान वाढवणारा भूगोल, सामाजिक भान निर्माण करणारा आणि चुका टाळण्याची शिकवण देणारा इतिहास, कायदे, प्रशासन, व्यवस्था याची ओळख करून देणारे नागरिक शास्त्र आणि आर्थिक साक्षरतेचा पाया रचण्यासाठीचे अर्थशास्त्र हे किमान आवश्यक विषय वयाच्या सोळाव्या किंवा सतराव्या वर्षाच्या टप्प्यापर्यंत मुलांना कळणे हे त्यांच्या भविष्यासाठी आवश्यक आहे. असा विचार पूर्वीच्या धोरणकर्त्यांनी मांडला. नवा अभ्यासक्रम तयार करताना पूर्वीप्रमाणे प्रचलित विषयांचे बंधन झुगारणे समितीला शक्य झाले नाही. ते झुगारणे व्यवहार्यही ठरले नसते. मात्र ते इतके अधिक करकचून बांधले गेले की तिसरी भाषा निवडण्याचीही मुभा वगळून हिंदीही बंधनकारक करण्यात आली. त्यामागे 'एक देश, एक निवडणुका'प्रमाणे 'एक देश, एक भाषा' हाच विचार दिसतो. त्याच्या जोडीने वेगळेपण ठसवण्यासाठी नव्या विषयांची चळत मांडण्यात आली खरी. ते विषय आकर्षक. मात्र, त्यांची आवश्यकता किती याचा विचार शून्य. नववीच्या विद्यार्थ्यांसाठी समाजातील महत्त्वाच्या व्यक्ती असा स्वतंत्र विषय बंधनकारक आहे. मग इतिहासात वेगळे काय असते? परंतु इतिहासातील नेहरूंची कर्तबगारी जाचू लागल्यामुळे पाठ्यपुस्तकांतून ती हळूहळू कमी करण्यात आली. पर्यावरण, जलसुरक्षा असे विषय विज्ञानात, भूगोलात होतेच. नळ दुरुस्ती करण्यासाठी भौतिकशास्त्राचा पाया किंवा सुतारकामासाठी भूमिती कळणे गरजेचे असते. पण या मूलभूत विषयांचे तास कमी आणि अतिरिक्त विषय मात्र वारेमाप. त्याचे कारण काय? थोडक्यात लिहिता येते कारण हात वळतो परंतु वाचता येत नाही ही स्थिती भविष्यकालीन धोक्याची चाहूल देणारी आहे. मुळात शिकणे महत्त्वाचे की सत्ताधाऱ्यांना हवे तेव्हा, हवे तितकेच शिकवता येणे महत्त्वाचे ? हा प्रश्न पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे बदललेले शैक्षणिक वेळापत्रक. उन्हाळी सुट्टीत शाळा–सुटी–शाळा हे बिनडोकपणाचे आहे. असे बिनडोकी प्रस्ताव या धोरणात विपुल. त्यात शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा हात किती आणि त्यांच्या कार्यालयाचे खरे नियंत्रण असणाऱ्यांची 'साठे'मारी किती हा खरा यातील कळीचा मुद्दा. खरे तर अशैक्षणिक गोष्टींचा सोस, प्रसिद्धी हव्यासासाठी चकचकीत घोषणा करण्याचे व्यसन शिक्षणाच्या मुळावर किती उठणारे आहे याची अनेक उदाहरणे गेल्या दोन वर्षांत सहजी देता येतील. पाठ्यपुस्तकालाच वह्यांची पाने जोडण्याने नेमके कोणते शैक्षणिक हित साध्य झाले, किती गुणवत्ता वाढली याचे उत्तर विभागाकडे नाही. मात्र अनेक दिवस प्रशासन या निर्णयाची पाठराखण करण्यात आणि शिक्षक नाइलाजाने का होईना आदेश पूर्ण करण्यात गुंतले. एकसमान गणवेश आणि त्याची केंद्रीय खरेदी हा आणखी एक असा निर्णय. त्यासाठी खर्ची घातलेल्या वेळात शिक्षकांना वर्गात उपस्थित राहून शिकवता आले असते तर एखादे आकडेमोड न येणारे मूल गणितावर प्रेम करू लागले असते. हे असे होते कारण शिक्षण या मूळ मुद्द्याशी फारकत घेण्याच्या वर्तणुकीचे मूळ हे त्याच्या विभाग रचनेत आहे. पूर्वी शिक्षण संचालनालय या प्रशासकीय यंत्रणेतील संचालक पदांवरील अधिकारी हे शिक्षण क्षेत्रातील असायचे किंवा स्वेच्छेने शिक्षण विभागातील काम पत्करलेले गटशिक्षण अधिकारी पदापासून पदोन्नतीने संचालक पदापर्यंत पोहोचलेले असायचे. व्यवस्थेतील चहाड पाखडून बाजूला काढल्यावर उरतात तेवढे व्यवस्थेचे पोषण करणारे अधिकारी या विभागातही होते. अजूनही आहेत. विभागात अगदी तळातील पदापासून मुरत मुरत वरिष्ठ पदापर्यंत पोहोचलेल्या या अधिकाऱ्यांत शिक्षण, समाज आणि राज्याची गरज यांबाबत एक किमान जाण असते. मात्र, आता महत्त्वाच्या संचालक पदांवर आयएएस असतात. त्यांच्यासाठी हे खाते म्हणजे 'साइड पोस्टिंग.' म्हणून अनेकजण केवळ नाइलाज म्हणून या विभागाचे पद पत्करतात. पण एखाद्या जिल्ह्यात चमकदार कामगिरी केलेल्या वा नावाजलेल्या अधिकाऱ्यांना शालेय शिक्षण विभागाची घडी नीट बसवता आलेली नाही. त्याचे कारण हा अधिकारी वर्ग शैक्षणिक विषयांकडे केवळ प्रशासकीय नजरेतून पाहतो. म्हणून अनुभवातून आलेले ताशीव शहाणेपण विरुद्ध वरचे पद असा संघर्ष विभागात सातत्याने पहायला मिळतो. त्यामुळे भल्या रात्री दीड–दोन वाजता मंत्र्यांनी घेतलेल्या बैठकांमध्ये मुलांची शैक्षणिक स्थिती काय यापेक्षा आमदारांनी पत्रातून केलेली मागणी कोणती, पोषण आहारात खीर द्यावी की अंडे आणि केंद्राच्या उपक्रमांसाठीचा प्रतिसाद अधिकाधिक छायाचित्रांमध्ये कसा परिवर्तित होईल याच्याच चर्चा झडतात.

# पोलिसदादा, समाजविघातक कृत्यांना लगाम लावाहो...!

दि.२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती. त्यानंतरपासून २१ ऑक्टोबर हा पोलिस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना या दिवशी श्रद्धांजली वाहिली जाते. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा हा ज्ञानवर्धक लेख अभ्यासा.... संपादक.

पोलीस स्मृतिदिन दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस भारत देशाची सुरक्षा आणि नागरिकांचे रक्षण करताना शहीद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी समर्पित आहे. सन १९५९ साली लडाखच्या हिंद–चीन सीमेवर चीनी सैनिकांनी भारतीय पोलिसांवर केलेल्या हल्ल्यात १० भारतीय पोलीस शहीद झाले होते. त्यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. या दिवशी देशभरात पोलीस दलातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शहीद पोलीस जवानांना आदरांजली वाहून त्यांच्या कुटुंबीयांना सन्मानित केले जाते. पोलीस दल देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असतात आणि त्यांचे योगदान समाजासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. पोलीस स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या त्यागाची आणि देशासाठी दिलेल्या सेवेची आठवण करून दिली जाते. हा दिवस पोलीस दलातील अधिकारी आणि जवानांच्या कर्तव्यदक्षतेचा सन्मान करण्याचा दिवस आहे, ज्यांनी आपल्या जीवनाची आहुती देऊन देशवासीयांचे रक्षण केले. आता गरज आहे, ती अल्पवयीन मुलींच्या बलात्कारांना लगाम घालण्याची, हे फार मोठे आव्हान आहे. पोलीस हुतात्मा दिन– देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी, कधी नक्षल्यांविरोधात तर कधी समाजविघातक कृत्य करणार्यांविरोधात कारवाई करताना, कर्तव्यात कसूर न करता वीरमरण प्राप्त झालेल्या पोलीस जवानांची आठवण मनात तेवत ठेऊन श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरात हा दिवस पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी, कधी नक्षल्यांविरोधात तर कधी समाजविघातक कृत्य करणार्यांविरोधात कारवाई करताना, कर्तव्यात कसूर न करता वीरमरण प्राप्त झालेल्या पोलीस जवानांची आठवण मनात तेवत ठेऊन श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरात हा दिवस पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. देशासाठी आपले कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलिसांचे स्मरण ठेवण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी पोलिस स्मृतिदिन साजरा केला जातो.

दिनांक २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती. त्यानंतरपासून २१ ऑक्टोबर हा पोलिस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना याच दिवशी श्रद्धांजलीही वाहिली जाते. जिल्ह्याच्या मुख्यालयामध्ये या निमित्ताने शहीद पोलिसांना अभिवादन करण्यात येते. यासोबतच विविध उपक्रमाचे आयोजनही करण्यात येते.

सन २०१८मध्ये पोलिस स्मृतिदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमध्ये पहिल्याच राष्ट्रीय पोलिस स्मारकाचे उद्घाटन केले. त्यांनी पोलिस दलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अभिवादन केले आणि देशातील लोकांना पोलिस म्यूझियम भेट देण्याचे आवाहन केले. आज राष्ट्रीय पोलिस मेमोरियलने सन १९४७ नंतरपासून आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व केंद्रीय आणि राज्य पोलिस दलाच्या ३४,८४४ पोलिस कर्मचाऱ्यांचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र पोलिसांकडूनही अभिवादन कार्यक्रम आयोजित केला जातो. आपले कर्तव्य पार पाडत असताना देशासाठी प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने आदरांजली वाहण्यात येते. हे राष्ट्र त्यांचे बलिदान कधीच विसरणार नाही. असे म्हणत महाराष्ट्र पोलिसांकडून अभिवादन केले जाते. ।।।। राष्ट्रीय पोलिस स्मृतिदिनानिमित्त समस्त शहीद जवानांना सॅल्यूट ऽऽऽ... जय हिंद! जय जवान!! जय किसान !!! ।।।।

*********

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी
(एक शेतकरीपुत्र)
वंद. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, रामनगर वॉर्ड,
गडचिरोली, जि. गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# साम्यवादी चीनची ७५ वर्षे

चीनसारख्या आशियातील एका अवाढव्य देशात मार्क्सवादी क्रांती झाल्याबरोबर अमेरिकादी भांडवलदारी राष्ट्रांचा चीनकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. माओनंतर डेंग यांची कारकीर्द गाजली. १४ मार्च २०१३ रोजी जिनपिंग चीनचे राष्ट्राध्यक्ष झाले आणि जगासमोर नवा चीन यायला लागला. विसाव्या शतकाच्या बरोबर मध्यावर म्हणजे १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले. जाता जाता या महायुद्धाने जगाचे राजकारण आमूलाग्र बदलले. यातील एक महत्त्वाची घटना म्हणजे ऑगस्ट १९४५ मध्ये हिरोशिमा आणि नागासाकी या दोन जपानी शहरांवर अणुबॉम्ब टाकले आणि जगाला अणुशक्ती किती संहारक असू शकते, याची जाणीव करून दिली. याच्या बरोबरीने आणि खास करून आशियाच्या संदर्भात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला मिळालेले स्वातंत्र्य आणि दुसरी घटना म्हणजे १ ऑक्टोबर १९४९ रोजी जगाच्या नकाशावर उदयास आलेला साम्यवादी चीन. यातील 'साम्यवादी' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. याचे कारण म्हणजे १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध जरी संपले तरी एका बाजूला अमेरिकाप्रणित भांडवलशाही राष्ट्रे आणि दुसरीकडे सोव्हिएत युनियनप्रणित साम्यवादी राष्ट्रे, यांच्यात शीतयुद्ध सुरू झालं. या शीतयुद्धात आशियात चीन हा अवाढव्य देश साम्यवादी देशांच्या गटात सामील झाला. भारताच्या १९२३ साली करार केला. पुढे लोकशाहीचे स्वरूप काय असावे व लोककल्याण कसे साधावे, याबद्दल डॉ. सन व चायनीज कम्युनिस्ट पार्टीत टोकाचे मतभेद झाले. परिणामी चीनमध्ये जरी साम्राज्यशाही संपली तरी कम्युनिस्ट शक्ती व राष्ट्रवादी शक्ती यांच्यात भीषण यादवी युद्ध (१९२७ ते १९५०) झाले. या यादवी युद्धात माओच्या नेतृत्वाखाली चीनचा विजय झाला. आताचा चीन समजून घ्यायचा असेल, तर ऑक्टोबर २०१७ मध्ये चीन कम्युनिस्ट पक्षाचे जे सतरावे अधिवेशन भरले होते तेथे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग यांनी केलेले भाषण समोर ठेवावे लागते. त्यांचे स्वप्न म्हणजे चीनला जगातील एक महासत्ता बनवणे, हे होय. जिनपिंग यांच्या योजनेनुसार इ.स. २०४९ मध्ये चीनने जगाचे नेतृत्व केले पाहिजे. याची सुरुवात म्हणून जिनपिंग यांनी सप्टेंबर २०१३ मध्ये 'बेल्ट अँड रोड इनिशिएटीव्ह' (बीआरआय) हा महाकाय प्रकल्प जाहीर केला.

यानुसार जुना खुष्कीचा मार्ग असलेला, मध्य आणि पश्चिम आशियातून गेलेल्या ऐतिहासिक रेशीम मार्गाचे पुनरूज्जीवन. दुसरीकडे असाच मार्ग समुद्रमार्गे तयार करायचा. या दोन्ही मार्गांद्वारे जागतिक व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. मात्र यातले बांधकामाचे जवळजवळ सर्व कंत्राटं चिनी कंपन्यांनाच मिळेल. ज्या देशांजवळ या महाकाय प्रकल्पासाठी निधी नसेल चीनबद्दल विशेष काळजी घ्यावी लागते. आज भारताने जरी चीनशी संबंध ठेवलेले असले, तरी भारताला याची पूर्ण जाणीव आहे की आशियाच्या राजकारणात त्याची स्पर्धा अंतिमतः चीनशीच आहे. याची जाणीव चीनलासुद्धा आहे. म्हणून भारताला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीचे कायम सभासदत्व मिळू नये म्हणून चीन प्रयत्न करत असतो.


जर चीनला फक्त दक्षिण आशिया, मध्य आशिया आणि पश्चिम आशियातून स्वतःच्या प्रभावक्षेत्राचा विकास करायचा असता, तर अमेरिका व युरोप यांनी याची फारशी दखल घेतली नसती. मात्र चीनने दक्षिण चीन समुद्रातून सागरी मार्गांवर हक्क सांगायला सुरुवात केलेली आहे. त्याचप्रमाणे चीनने स्वतःच्या नौसेनेचे मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण केले आहे, करत आहे. चीनच्या हे लक्षात आलेले आहे की त्याचा समुद्रमार्गे होत असलेला व्यापार तितकासा सुरक्षित नाही. म्हणून चीन आता दक्षिण चीन समुद्रात आक्रमक झाला आहे. याचा थेट परिणाम अमेरिकेवर आणि म्हणूनच युरोपवर होणार आहे. यामुळे अमेरिका आणि युरोप चीनबद्दल साशंक असतात. भारताने या बदलांचा फायदा घेत चीनविरोधी आघाड्यांमध्ये मनापासून सामील झाले पाहिजे. भारत–चीनच्या संदर्भात निर्माण झालेली स्थिती अभूतपूर्व आहे. एकाच खंडात



संदर्भात आज पंचाहत्तरी साजरा करत असलेल्या चीनचे आगळे महत्त्व आहे. भारत आणि चीनची सुरुवातीला अनेक वर्षे मैत्री होती. पंडित नेहरूंच्या काळात तर सुरुवातीला 'चिनी हिंदी भाई भाई'चे नारे दुमदुमले होते. नंतर या दोन देशांत सीमाप्रश्नावरून वाद झाले आणि शेवटी ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर अचानक हल्ला केला. तेव्हापासून चीन आणि भारत यांच्या संबंधांत जबरदस्त चढउतार होत असतात. या पार्श्वभूमीवर आता ७५ वर्षांच्या झालेल्या चीनचा विचार करायचा आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जगभर बदलाचे वारे वाहायला लागले. ते वारे चीनमध्ये डॉ. सन यत् सन (१८६६–१९२५) यांच्या रूपाने दाखल झाले. डॉ. सन यत् सन यांच्या प्रयत्नांनी इ.स. १९११ साली चीनमधील साम्राज्यशाही संपली व 'प्रजासत्ताक चीन' चा उदय झाला. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे इ.स. १९२१ साली 'चायनीज कम्युनिस्ट पार्टी'ची स्थापना झाली. साम्राज्यशाहीचे अवशेष पूर्णपणे संपवण्यासाठी डॉ. सन यांनी सोव्हिएत युनियनशी त्या देशांना चीन कर्ज देईल. हा प्रकल्प पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्यामुळे भारताने सुरुवातीपासून बीआरआयला विरोध केलेला आहे. बीआरआयच्या मागे चीनची महत्त्वाकांक्षा लपून राहिली नव्हती. त्यामुळे सुरुवातीचा थोडा काळ गेल्यावर अनेक देशांनी तसेच अभ्यासकांनी या प्रकल्पाबद्दल आक्षेप घ्यायला सुरुवात केली. नंतर करोनाचा कहर सुरू झाला होता तेव्हासुद्धा यामागे चीनचाच हात आहे वगैरे आरोप होत होते, अजूनही होत असतात. चीनच्या संदर्भात भारताला सतत जागरूक राहावे लागते. एक महासत्ता म्हणून अमेरिका व युरोपला चीनचा त्रास होतो तो व्यापारी युद्धात. भारताला मात्र शेजारी चीनच्या विस्तारवादाचा अष्टौप्रहर सामना करावा लागतो. याची सुरुवात ऑक्टोबर १९६२ साली चीनने भारतावर लादलेल्या युद्धापासून झाली आहे. एकविसाव्या शतकातसुद्धा यात खंड पडलेला नाही. जून २०१७ मधला डोकलाममधील ताण आणि नंतर लडाखमधील गलवान खोर्यातील खडाखडी, ही याची ताजी उदाहरणं. म्हणून भारताला दोन मोठे, प्रचंड लोकसंख्या असलेले देश; दोन प्राचीन संस्कृती, दोन अण्वस्त्रधारी देश आणि असे दोन शेजारी ज्यांच्यात गेले अनेक दशकं सीमावाद सुरू आहे. हा भूगोल तसेच इतिहास कोणीही बदलू शकणार नाही. यांना सोबत घेतच पुढची वाटचाल करावी लागणार आहे. म्हणूनच भारताला चीनवर सतत नजर ठेवणे गरजेचे आहे. आजच्या चीनचे नेतृत्व शिनपिंग यांच्यासारखा महत्त्वाकांक्षी नेता करत आहे. ते सतत स्वतःची सत्ता वाढवण्याचे प्रयत्न करत असतात. आजही चीनमध्ये विरोधी पक्षांना स्थान नाही. नागरिकांना सरकारवर टीका करण्याचा अधिकार नाही. दुसरीकडे चीनमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. चीनमधील आजच्या तरूण पिढीला अमेरिकेसारखी जीवनपद्धत हवी आहे. ही अस्वस्थता तिथल्या समाजमाध्यमांवर व्यक्त होत असते. चीनने ज्याप्रकारे हाँगकाँगचे उदारमतवादी संस्कृतीवर वरवंटा फिरवला ते अनेकांना आवडलेले नाही. त्याचेसुद्धा पडसाद उमटत असतातच. या सर्वांचा चिनी राज्यकर्त्यांना सामना करावा लागत आहे.

# निवडणुकीच्या काळामध्ये सुजाण नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी केले.

केज/प्रतिनिधी :- निवडणुकीच्या काळामध्ये सुजाण नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना महत्त्वाच्या सूचना पोलीस निरीक्षक महाजन यांच्याकडून निवडणुकीच्या काळात सुजान नागरिकांनी कोणत्याही उमेदवाराची,व्यक्तीची किंवा कुटुंबीयांची सामाजिक स्तरावर अवहेलना होईल, अशी आक्षेपार्ह टीका टिप्पणी करू नका. फोटो, व्हिडिओ (मॉर्फिग) बनवून प्रसारित करू नका. अशा पोस्टवर सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करु नका. ते कायद्याने गुन्हा आहे. मतदारांचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्म, जातींबाबत द्वेष पसरविणाऱ्या पोस्ट करू नका.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल, अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित करु नका. दोन गटांत तणाव निर्माण होईल, अशा पोस्ट सोशल मीडियावर करु नका असे आवाहन पोलीस निरीक्षक महाजन साहेब यांनी बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला आवाहन केले आहे जर कोणी याचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कोठारात कठोर कारवाई करण्यात येईल तसेच सदर पोस्ट व्हायरल करणाऱ्या वर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले जातील यामुळे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोष्ट करने टाळावे असे आवाहन केज पोलीस प्रशासना कडून करण्यात आले आहे.

# माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान नाव्होली यांच्या कडुन शेतकऱ्यांच्या पीक नुकसान भरपाईसाठी खंडपीठात पुन्हा जनहित याचिका दाखल

केज/प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना पिकनुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल जनहित याचिके च्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या.मंगेश पाटील आणि न्या.एस.पी. ब्रम्हे यांनी राज्यशासना सह,महसूल आणि वन विभागाचे मुख्य सचिव कृषी विभागाचे प्रधान सचिव,छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त आणि बीड जिल्हाधिकारी यांना नोटीस बजावण्याचा आदेश दिला.केज तालुक्यातील माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान यांनी अड.शेख तारेक मोबीन यांच्या मार्फत दाखल केलेल्या दुसऱ्या जनहित याचिकेत म्हटल्या प्रमाणे२०१९-२० साली राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळेशेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना पिकनुकसान भरपाई देण्याबाबत राज्य शासनाने दि.२९ ऑगस्ट २०१९ रोजी शासननिर्णय जाहीर केला होता.मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही.म्हणूनजनहित याचिका क्र.१३२/२०९ दाखल करण्यात आली होती.सुनावणी



दरम्यान शासन निर्णयाची अंमल बजावणी करीत असल्या बाबतचे निवेदन सरकारी वकील केले होते.त्यामुळे खंडपीठाने ती जनहित याचिका निकाली काढली होती.२०१९ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नसताना,राज्य शासनाने दि.९ नोव्हेंबर २०२० रोजी दुसरा शासन निर्णय जाहीर करून अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे घोषित केले.त्यावरून बीड जिल्ह्यातील नाव्होली येथील माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान व ग्रामस्थांनी आणि याचिका कर्त्या न्यासानेशेतकऱ्यांना पिक नुकसान भरपाई मिळावी,यासाठी उपोषणाचा,आत्मदहनाचा इशारा दिला होता. याचिकाकर्त्यांनी दि.१ डिसेंबर २०२१ रोजी प्रतिवाद्यांना निवेदन देऊन दि.२९ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयानुसार तसेच जनहित याचिका क्रमांक १३२/१९ च्या अनुषंगाने खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार बीडजिल्ह्या तील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केलीहोती.नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे दुसरी जनहित याचिका दाखल केली आहे. शासनाने न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याने शेतकरी पिक नुकसान भरपाई पासुन वंचीत राहीलेले आहेत. अशा दुतोंडी सरकारला शेतकरी जागा दाखविणार असल्याचा ईशारा माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी.बी.एस. ईनामदार,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विनोद चाटे पाटील, राष्ट्रवादी किसान आघाडी सेलचे केज तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव,सामाजिक न्याय केज तालुकाध्यक्ष अक्षय मजमुले,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज तालुका युवक अध्यक्ष कैलास चाळक यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

# महायुतीने केज मतदार संघाच्या उमेदवारी बाबत पुनर्विचार करावा-दीपक कांबळे

केज-प्रतिनिधी :- केज मतदार संघाची पप्पू कागदे यांची उमेदवारी डावल्यामुळे बीड जिल्ह्यासह केज मतदार संघातील कार्यकर्ते भाजप पक्षावर प्रचंड नाराज झाले आहेत. महायुतीने केज मतदार संघाच्या उमेदवारी बाबत पुनर्विचार करावाअशी मागणी तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, आरपीआय आठवले पक्षाचे संस्थापक केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडमध्ये युवा आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी अवघ्या काही दिवसापूर्वी जाहीर नागरी सत्कार केला होता. या सत्काराच्या व्यासपीठावरून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केज विधानसभा मतदारसंघातून आरपीआयचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीडचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी महायुतीने जाहीर करावी अशी रोखठोक भूमिका घेतली होती. असे असताना सुद्धा भारतीय जनता पार्टीने पहिल्याच यादीत केज विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांचे नाव जाहीर केले. त्यामुळे आता आरपीआयला महायुती मधून बीड जिल्ह्यात एकही जागा मिळणार नाही. हे स्पष्ट झाल्यामुळे आरपीआय आणि पप्पू कागदे यांची भूमिका काय असेल ते लवकरच स्पष्ट होईल. मात्र केजची उमेदवारी विद्यमान आमदाराला जाहीर करून भाजपाने आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे हे नक्की. मागील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये आरपीआय ने केज विधानसभा राखीवमतदार संघामध्ये अधिकृत दावा केला होता. तत्कालीन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देखील केज विधानसभा निवडणुकीसाठी आरपीआयला जागा सोडून पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली होती. मात्र ऐन वेळी राजकीय भूमिका बदलली गेली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा दस्तूर खुद्द शरदचंद्र पवार यांनी स्वतः बीड येथे नमिता मुंदडा यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी जाहीर केलेली असताना भारतीय जनता पार्टीने त्यांना पक्ष प्रवेश देऊन भारतीय जनता पार्टीची उमेदवारी दिली आणि त्या निवडून आल्या. मागील पाच वर्षात विद्यमान आमदाराने भारतीय जनता पार्टी आणि महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेनेसह इतर कोणत्याही घटक पक्षाला आणि पक्षांतर्गत नेतृत्वाला संधी दिली नाही. मागील पाच वर्षात मुंदडा यांनी मनमानी कारभार केला. यामुळे त्यांची उमेदवारी जाहीर होताच भाजपा शिवसेनेने पक्षांतर्गत त्यांच्या नावाला प्रचंड विरोध केला आहे. एकीकडे हे राजकीय पक्षांतर्गत वावटळ उठलेले असतानाच आता केज या राखीव मतदार संघातून कायम आरपीआय पक्षाला गाजर दाखवण्याचे काम भाजपाने केले.



त्यामुळे आरपीआयचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा आरपीआयचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काय राजकीय भूमिका घेतात ? याकडे बीड जिल्ह्याचे लक्ष वेधणार आहे. विशेषतः त्यांची भूमिका केज विधानसभेच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांच्यासाठी धोक्याची घंटा ठरते का? हे येणारा काळच ठरवेल. केजसह बीड जिल्ह्यातील इतर सर्व सहा विधानसभा मतदारसंघात आरपीआय म्हणजेच पप्पू कागदे काय निर्णायक भूमिका घेतात यावर महायुतीच्या उमेदवारांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. गेल्या पाच वर्षात महाराष्ट्रातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ला महायुतीने सत्तेवर असतानाही दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. केज विधानसभेसाठी रामदास आठवले हे पप्पू कागदीसाठी आग्रही असतानाही केसची उमेदवारी डावण्यात आल्यामुळे केज मतदार संघात प्रचंड नाराजी पसरली आहे भाजप रिपब्लिकन पक्षाचा केवळ निवडणुकीपुरता वापर करत असल्याच्या भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाल्या आहेत असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना तालुकाध्यक्ष कांबळे यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना कांबळे म्हणाले की, माहितीने केज मतदार संघाच्या उमेदवारीबाबत पुनर्विचार करावा अन्यथा येणाऱ्या काळामध्ये आम्हाला वेगळा विचार करावा लागेल असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला आहे.

# मोबाईलच्या वापराने वाचन संस्कृती ऱ्हास होत आहे - प्राचार्य डॉ. संग्राम मोरे

मुरुड/महेंद्र आल्टे :- भारतीय संविधानाने तमाम भारतीयांना सर्वाधिकार बहाल केले त्यामुळे सर्व बहुजन अधिकार संपन्न झाले. शिक्षणामुळे अनेक विचारवंतांचे, समाजसुधारकांचे विचार वाचायला लागले त्यातून अनेक विचारवंत, प्रशासकीय अधिकारी अनेक साहित्यिक निर्माण होऊ लागले पण अलीकडेच मोबाईलचा शिरकाव झाला आणि शिक्षण घेत असलेले शाळा महाविद्यालयातील तरुण मुले मुली यांच्या हातात पुस्तका ऐवजी मोबाईल आला त्यामुळे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे असे उद्गार सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ.संग्राम मोरे यांनी काढले मुरुड येथील संभाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, इतिहास व भूगोल अभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटक तथा प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. संग्राम मोरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम होते. सर्व मान्यवरांकडून भारतीय संविधानास अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तदनंतर सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळातील सर्व नवनिर्वाचित अभ्यास मंडळाचे पदाधिकारी यांचा उद्घाटक तथा प्रमुख पाहुणे व प्राचार्य यांच्या हस्ते गुलाब फूल देऊन सत्कार करण्यात




आला. पुढे बोलताना ते म्हणाले की, आता सरकारी नोकरी आपणाला लागेल या भरवशावर कुणीही राहू नये कारण भारताने जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या धोरणाचा स्वीकार केला त्यामुळे स्वतःच आपल्यातील स्किल विकसित करून स्वतःच स्वयंरोजगार निर्माण करावा लागणार आहे. या कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करत असताना प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनीही विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ. मधुकर चावरे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी.एम.रणदिवे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ बी.एम.गोरे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. एच. एस. वाघमारे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डी.आर. चव्हाण, प्रा.एन.एल.पैठणकर, प्रा. डॉ.जी. एल. जाधव, प्रा. डॉ.एस.एन.उबाळे, प्रा. डॉ.आर.जी.भोसले, प्रा. उपाडे संजीव यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास प्रा. डॉ. बिडवे एम. एस., प्रा.मधुकर क्षीरसागर, प्रा.पी.बी. महाजन, प्रा.ए.व्ही.सूर्यवंशी, प्रा. शैलेंद्र सुतार, प्रा. घोडके, प्रा.पाटोळे, प्रा.डॉ. सुरवसे व बहुसंख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# कच्च्या पपईची भाजी कधी खाल्ली आहे का? आरोग्यासाठी ठरते फायदेशीर

पपई हे एक फळ असून हे फळ आरोग्यासाठी फार फायदेशीर मानलं जाते. यातील शक्तिशाली अँटिऑक्सिडंट रोप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. यात अनेक पोषक घटक आढळतात जे आरोग्याच्या समस्या दूर करण्यास मदत करतात. पपईच्या सेवनाने पोटासंबंधी समस्या जसे की, ब्लोटिंग, बद्धकोष्ठता, सूज इत्यादी समस्या दूर होतात. शिवाय याच्या सेवनाने पचनक्रियादेखील सुरळीत होते.आता तुम्हाला जर पपई हे फळ खायला आवडत नसेल तर आम्ही तुम्हाला सांगतो की, तुम्ही यापासून चविष्ट अशी भाजी तयार करू शकता. अर्थात ही भाजी आपण कच्च्या पपईपासून तयार करणार आहोत. पपईची ही मऊदार आणि मसालेदार भाजी चवीला अप्रतिम लागते. आपल्या जेवणात तुम्ही एकदा तरी या भाजीचा निश्चितच समावेश करायला हवा. जाणून घ्या पपईची भाजी बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.साहित्य १ लहान पपई १ टेबलस्पून जीरे, हिरवी मिरची ठेचा ३ टेबलस्पून उडीद डाळ १ टेबलस्पून जीरे ,मोहरी १/२ टेबलस्पून हिंग १ टेबलस्पून हळद ३ टेबलस्पून तेल ३ टेबलस्पून ओले खोबरे कोथिंबीर,कडीपत्ता पाने चवीनुसार मीठ १/२ लिंबू रस कृती पपईची भाजी बनवण्यासाठी सर्वप्रथम एक चमचा जीरे, हिरवी मिरची ठेचा, तीन चमचे उडीद डाळ आणि पपई, घेऊन ठेचा तयार करून घ्या हा ठेचा तयार करताना जीरे, हिरवी मिरची,आले बारीक करून घ्या आता गॅसवर एक कढई ठेवा आणि यात मोहरी, जीरे, हिंग, कडीपत्ता आणि हळद टाकून परतून घ्या मग यात पपई आणि मीठ घाला आणि सर्व साहित्य नीट एकजीव करा आता यावर झाकण ठेवा आणि मंद आचेवर २-३ मिनिटे शिजवून घ्या यानंतर यात सुख्या खोबऱ्याचा किस आणि लिंबाचा रस टाका आणि भाजीत मिसळा हवे असल्यास यात हलके पाणी टाका, जेणेकरून भाजी कढईला चिकटणार नाही काही मिनिटे शिजवल्यानंतर शेवटी यावर चिरलेली कोथिंबीर घाला आणि गॅस बंद करा अशाप्रकारे तुमची चटपटीत आणि मसालेदार पपईची भाजी तयार होईल गरमागरम पपईची चविष्ट भाजी खाण्यासाठी सर्व्ह करा

# आर्थरायटिसवर काय उपचार असतात?

यंदाच्या जागतिक संधिवात दिवसाची संकल्पना 'इन्फॉर्म्ड चॉईसेस अँड बेटर आउटकम्स' अशी आहे. रुग्णांना संपूर्ण आणि योग्य माहिती देऊन उत्तम उपचार आणि परिणाम साध्य करणं असं मूळ उद्दिष्ट आहे. आर्थरायटिस हा आजार सर्वपरिचित आहे, मात्र याची संपूर्ण माहिती लोकांमध्ये अजूनही नाही.

या अनुषंगाने एकंदरीत आर्थरायटिस आणि त्यामध्ये होणार्या वेदनांबद्दल जाणून घेणं आपली क्वालिटी ऑफ लाइफ निश्चितपणे वाढवणार आहे. यामुळे आर्थरायटिसमुळे समाजावर आलेला शारीरिक, आर्थिक आणि भावनिक भार कमी होण्यास मदत होणार आहे.

मागच्या दोन लेखात आपण, ऑस्टियो आर्थरायटिस आणि रूमटोइड आर्थरायटिस याबद्दल जाणून घेतलं. आज आपण या दोन्हीच्या फिजिओथरेपी उपचारांबद्दल जाणून घेऊया. सौम्य आणि मध्यम प्रकारच्या आर्थरायटिसवर फिजिओथेरपी या तत्वांवर काम करते. पेशंट एज्युकेशन आणि पेन एज्युकेशन- मागच्या दोन भागात आपण बद्दल ऑस्टियो आर्थरायटिस आणि रूमटोइड आर्थरायटिसबद्दल पूर्ण माहिती त्याच्या टप्प्यांसहित समजून घेतली. फिजिओथेरपिस्ट रूग्णाला ही माहिती त्याला समजेल अशा भाषेत उदाहरणांसहित समजावून देतात, यामुळे रुग्णाच्या मनातील गैरसमज दूर होतात, भीती कमी होते, आणि आपल्याला नक्की काय झालंय हे कळल्यामुळे पुढचा प्रवास सोपा होतो. वेदना का होते आहे, होणार्या वेदनेवर कसे उपाय करता येतील, आपला या वेदनेकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा असायला हवा असे अनेक पैलू यातून उलगडतात. रूमटोइड आर्थरायटिस हा पूर्णपणे बरा होणारा आजार नाही, आपल्याला यासहित आपलं आयुष्य परिपूर्णपणे जगायचं आहे हा विचार रुग्णाच्या मनात रुजवावा लागतो.

मसल स्ट्रेन्थ वाढवणं: ऑस्टियो आर्थरायटिसमध्ये गुडघ्याच्या आणि खुब्याच्या आजूबाजूच्या स्नायूंची शक्ती वाढवणारे व्यायाम रुग्णाला शिकवले जातात.

बर्याच वेळा रुग्णांना मसल स्पेसिफिक व्यायाम आणि शारीरिक हालचाल या वेगळ्या गोष्टी आहेत हे माहिती नसतं. ऑस्टियो आर्थरायटिसमध्ये जितकी गरज ही शारीरिक हालचालीची असते तितकीच मसल स्पेसिफिक व्यायामांचीही असते. मनाने केले जाणारे योगासनाचे प्रकार किंवा हालचाली या फिजिओथेरपिस्टने शास्त्रीय दृष्टीकोनातून ठरवून दिलेल्या व्यायामांची जागा घेऊ शकत नाहीत. रूमटोइड आर्थरायटिसमध्ये स्नायू आणि सांधे अत्यंत नाजूक परिस्थितीत असतात, अशावेळी व्यायाम ठरवताना आणि करवून घेताना अतिशय काळजी घ्यावी लागते. हे घरच्या घरी किंवा फिजिओथेरपिस्ट शिवाय होऊ शकत नाही.



एरोबिक व्यायाम: यामध्ये रूग्णाला अनुसरून चालणं, सायकल चालवणं किंवा शक्य असेल तेव्हा स्विमिंग करणं असे व्यायाम प्रकार त्यांच्या कालावधी आणि तीव्रतेनुसार शिकवले संगितले जातात. हे जनरल बॉडी एक्सरसायजेस असतात ज्यामुळे वजन कमी होणं, हृदयाची क्षमता वाढणं, वेदनेची तीव्रता कमी होणं, मूड सुधारणं असे फायदे दिसून येतात. हे रूग्णाला अनुसरून असल्याने यामध्ये व्यक्तीगणिक भिन्नता असते.

मसल स्ट्रेचिंग : ज्याप्रकारे गुडघ्याच्या आणि खुब्याच्या आजूबाजूच्या स्नायूंची शक्ती वाढवणारे व्यायाम संगितले जातात त्याचप्रमाणे यापैकी काही स्नायूंना ताण देणारे व्यायाम देखील आवश्यक असतात, शक्ती वाढवणारे आणि लवचिकता वाढवणारे व्यायाम हे एकमेकांना परस्पर पूरक असतात. कुठल्या स्नायूंना बळकटी वाढवण्याच्या व्यायामांची गरज आहे आणि कोणत्या स्नायूंना लवचिकता वाढवणार्या व्यायामांची गरज आहे हे ओळखून त्यानुसार व्यायाम ठरवले जातात.

जीवनशैलीतील बदल : आपला आहार, झोप, विचार, वजन, सवयी या होणार्या वेदनेवर कसा आणि कुठपर्यंत परिणाम करू शकतात, आणि यात सुधारणा करण्यासाठी कोणते बदल करायला हवे याची सखोल माहिती रूग्णाला दिली जाते.

तोल आणि चपळता वाढवणारे व्यायाम : रोजच्या आयुष्यातील चालणं, पायर्या कुठल्याही आधाराशिवाय चढणं आणि उतरणं, उठबस करणं, हातात वजन उचलून चालणं, या आणि अशा अनेक हालचाली सुलभ आणि आत्मविश्वासपूर्ण होण्यासाठी या व्यायामांची नितांत गरज असते.

जॉइंट प्रोटेक्शन टेकनिक्स रूमटोइड आर्थरायटिसच्या रुग्णाला विविध जॉइंट प्रोटेक्शन टेक्निक शिकवले जातात ज्याद्वारे हाताच्या छोट्या स्नायूंवर येणारा भार कमी करून, कोपर आणि खांदा यांचा जास्तीत जास्त वापर कसा करायचा हे रुग्णाला शिकवलं जातं. तसंच रुग्णाच्या कामाच्या ठिकाणी, घरात किंवा स्वयंपाकघराच्या रचनेत काही बदल सुचवले जातात.

# भाजपच्या पहिल्या यादीतून लातूर शहर, लातूर ग्रामीण ला का वगळले?



लातूर :- भाजपने काल जाहीर केलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीच्या पहिल्या उमेदवार यादीची घोषणा केली. ९९ उमेदवारांच्या या यादीत मराठवाड्यातील १६ मतदारसंघांचा समावेश आहे.मात्र लातूर जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण या अनुक्रमे अमित देशमुख, धीरज देशमुख या काँग्रेस आमदारांच्या मतदारसंघातील उमेदवार मात्र अद्याप जाहीर झालेले नाहीत. भाजपच्या पहिल्या यादीत या दोन मतदारसंघांना स्थान का देण्यात आले नाही? यावरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. निश्चितच भाजपची दुसरी यादी येणार आहे, परंतु काँग्रेसकडे असलेल्या लातूर शहर आणि ग्रामीण मतदारसंघाबाबत राज्याचे वरिष्ठ नेते निर्णय का घेऊ शकले नाही? असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. भाजप या दोन मतदारसंघामध्ये सेटलमेंट करते, असा आरोप सातत्याने केला जातो. देशमुख बंधुंना निवडणूक सोपी जावी, असेच प्रयत्न केले जातात, कुमकुवत उमेदवार दिले जातात, असा आरोप विरोधकच नाही तर भाजपचे आमदारही करतात. अशावेळी पहिल्या यादीतून हे दोन मतदारसंघातून वगळ्याने संशय अधिक बळावला आहे. लातूर शहर आणि ग्रामीण या दोन्ही मतदारसंघावर काँग्रेसची पकड आहे. लातूर शहर मतदारसंघातून काँग्रेसचे अमित देशमुख सलग तीन वेळा निवडून आले आहेत. तर लातूर ग्रामीण मध्ये धीरज देशमुख हे गेल्या निवडणुकीत पहिल्यांदा विजयी झाले आहेत. लातूर शहर मतदारसंघावर पुर्वी पासून काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे.

लातूर शहर विधानसभा २०२४ : अमित देशमुखांना पुन्हा बाय ? की महायुती तगडा उमेदवार देणार अमित देशमुख यांच्याआधी त्यांचे वडील दिवंगत विलासराव देशमुख यांनी तब्बल सहा वेळा या मतदारसंघातून निवडणूक लढवलेली आहे. पैकी पाच वेळा ते विजयी झाले होते, तर १९९५ मध्ये जनता दलाचे शिवाजी पाटील कव्हेकर यांनी त्यांचा पराभव केला होता. २००८ नंतर या मतदारसंघाचे विभाजन होऊन लातूर शहर आणि ग्रामीण असे दोन भाग झाले. आधीच्या लातूर शहरवर मजबुत पकड असलेल्या काँग्रेसने विभाजनानंतर लातूर ग्रामीणवरही ताबा मिळवला. लातूर शहरमध्ये अमित देशमुख यांनी विजयाची हॅट्रीक केली आहे, तर त्यांचे बंधू धीरज देशमुख यांनी लातूर ग्रामीण मध्ये गेल्या निवडणुकीत विजय मिळवला आहे. लातूर शहर मतदारसंघात अमित देशमुख यांनी २००९ मध्ये शिवसेनेच्या श्रीपाद कुलकर्णी यांना तर २०१४-२०१९ या दोन निवडणुकीत भाजपच्या शैलेश लाहोटी यांचा पराभव केला होता. या तीनही निवडणुकीत अमित देशमुख यांचे मताधिक्य मोठे होते.

भाजपला बंडखोरीची भीती; 'गुजरात पॅटर्न' नको रे बाबा! विद्यमानांचा जीव पडला भांड्यात तिकडे लातूर ग्रामीण मध्ये २००९ मध्ये स्वतंत्र मतदारसंघाच्या पहिल्या निवडणुकी काँग्रेसच्या वैजनाथ शिंदे यांनी भाजपच्या रमेश कराड यांचा पराभव केला होता. तर त्यानंतरच्या २०१४ मध्ये भाजपच्या रमेश कराड यांना दुसऱ्यांदा पराभूत करत काँग्रेसच्या त्रिंबक भिसे यांनी विजय मिळवला होता. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसने धीरज देशमुख यांना उमेदवारी दिली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार झाले. पण यासाठी त्यांना भाजप व इतर विरोधकांचीच साथ मिळाल्याचे बोलले जाते. भाजपने ही जागा शिवसेनेला सोडली पण त्यांच्या सचिन देशमुख यांना साडे तेरा हजार आणि नोटाला साडे सत्तावीस हजार मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराने १३ हजार मते घेत धीरज देशमुख यांच्या विजयाला हातभार लावला होता. १ लाख २१ हजार ४८२ एवढ्या प्रचंड मताधिक्याने धीरज देशमुख निवडून आले होते. आता महायुतीतील भाजपकडे या दोन्ही मतदारसंघात इच्छुकांची गर्दी आहे. मात्र देशमुख भावांच्या विरोधात कोणाला उमेदवारी द्यायची, याचा निर्णय पक्षाचे वरिष्ठ नेते पहिली यादी जाहीर झाली तोपर्यंत घेऊ शकले नव्हते. दुसऱ्या यादीकडे या इच्छुकांच्या आता नजरा लागल्या आहेत.

# स्वराज शक्ती सेनेच्या वतीने औसा तालुका येथून विधान सभे साठी नौशाद उर्फ नाना शेख यांना उमेदवारी जाहीर

**लातूर शहर व औसा तालुका या दोन्ही विधानसभा क्षेत्रातातुन उमेदवारी अर्ज दाखल करणार व लढणार - नौशाद शेख**





लातूर :- औसा तालुका विधानसभा क्षेत्र येथून सक्रिय सामाजिक कार्यकर्ते व दैनिक जय हिंद महाराष्ट्राचे संपादक श्री.नौशाद इकबाल शेख यांना स्वराज शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ.करुणा मुंडे यांनी पक्षाचे अधिकृत विधानसभेचे उमेदवार म्हणून आज पक्ष कार्यालय येथून घोषित केले आहे.नौशाद शेख हे मूळचे केसर जवळगा या गावाचे सुपुत्र आहेत सतत समाजामध्ये चांगले काम करणे पीडित शोषित वंचित यांच्या मदतीला धाऊन जाणे समाजासाठी निस्वार्थ समाजसेवा करणे अशा अनेक त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना औसा विधानसभेची उमेदवारी दिली आहे.म्हणून मुंडे यांनी जाहीर केले आहे. शैक्षणिक,सामाजिक, राजकीय,क्षेत्रामध्ये व चळवळी मध्ये धडाडीने कार्य करून तळागाळा तील लोकांना त्यांच्या हक्कासाठी न्यायासाठी संघर्ष करणारा व आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून जनहितार्थ वाचा फोडणारा एक लढया पत्रकार म्हणून शेख यांची समाजामध्ये ओळख आहे.नौशाद शेख यांचं पत्रकारिता मध्ये शिक्षण झाले असून राजकीय दृष्ट्या पाहता त्यांना चांगला अभ्यास आहे लातूर जिल्ह्यात व औसा तालुक्यातील युवकांमध्ये व समाजा मध्ये जन सेवेच्या माध्यमातून त्यांनी एक सक्रिय धडाडीचा कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण केली आहे.तसेच २०२४ मध्ये धाराशिव येथून लोकसभा त्यांनी याच पक्षाच्या चिन्हावर लढवली होती.शेख यांचा समाजा मधील व औसा तालुक्यातील लोकांशी व युवकांशी असलेला मोठा जनसंपर्क पाहून व राजकीय अनुभव पाहून अशा सामान्य पण वैचारिक लढवय्या सेवकाला विधान भवनात जाऊन जनतेचे प्रश्न मांडता यावे या साठी औसा तालुका येथून विधानसभेची उमेदवारी पक्षाच्या वतीने नौशाद इकबाल शेख यांना जाहीर केले आहे म्हणून स्वराज शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ.करुणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे!! माध्यमांनी नौशाद शेख यांना काही प्रश्न विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया दिली संधीचे सोने करणार व सर्व सामान्य मतदार माता बंधू च्या अधिकारासाठी व न्याय हक्कासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचणार सोबत लातूर शहर व औसा तालुका या दोन्ही विधानसभा क्षेत्रातून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.तसेच स्वराज शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ.करूना ताई मुंडे यांनी माझ्यावर विश्वास ठेवून ही संधी मला दिल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो!!जय हिंद

# मुंडे यांचे कट्टर समर्थक अंतरवालीत

बीड : प्रतिनिधी मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीबाबतची आपली भूमिका जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रातील राजकारण वार-यासारखं बदलताना दिसत आहे. मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी अनेक पक्षांतील लोकांच्या रांगा लागल्या आहेत. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचे कट्टर समर्थक असलेल्या नेत्याने पदाचा राजीनामा देऊन जरांगे यांची भेट घेतली. त्यामुळे बीडमध्ये यंदा मोठी उलथापालथ होणार का? अशी चर्चा रंगली आहे. भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. राजेंद्र म्हस्के हे पंकजा मुंडे यांचे कट्टर समर्थक मानले जातात. म्हस्के हे गेली सहा वर्षे बीड भाजपचे जिल्हाध्यक्ष आहेत.

त्यांनी बीड जिल्हा परिषदेत उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. राजेंद्र म्हस्के बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी उत्सुक आहेत. काल जरांगे पाटील यांनी त्यांचे उमेदवार येत्या विधानसभेत उभे करणार असल्याची घोषणा केल्यानंतर आज राजेंद्र म्हस्के यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली.

# पोलिस स्मृती दिनानिमित्त देशभरातील वीरगती प्राप्त २१६ पोलीस अधिकारी अंमलदार यांना मानवंदना देण्यात आली.





लातूर :- लातूर पोलिस मुख्यालयात वीरगती प्राप्त पोलिसांना लातूर जिल्हा पोलीस दलाच्या पोलीस मुख्यालयाच्या आवारात असलेल्या शहीद स्मारक येथे सकाळी ८ वाजता लातूर पोलीस दलाच्या वतीने पोलीस स्मृती दिन निमित्ताने कर्तव्य बजावत असतांना वीरगती प्राप्त झालेल्या शहीद पोलीसांना मानवंदना देण्यात आली.

लडाखमधील भारतीय सीमेवरील बर्फाच्छादीत व निर्जन अशा हॉटस्प्रिंग या ठिकाणी भारताचे १० पोलीस जवान गस्त घालत असताना २१ ऑक्टोंबर १९५९ रोजी अचानक दवा धरुन बसलेल्या चिनी सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्या हल्याला शेवटपर्यंत चोख प्रत्युत्तर दिले.

दिनांक १ सप्टेंबर २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत भारताच्या विविध राज्यामधील पोलीस ठाणे तसेच विशेष पथकांमध्ये कर्तव्य बजावत असताना शहीद झालेल्या २१६ वंदनीय वीर पोलीस अधिकारी व अंमलदार यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वीर जवानांनी आपल्या देशाच्या सीमेची रक्षण करताना दाखविलेल्या या उच्च कोटीच्या शौर्याची गाथा इतरांना कळावी तसेच राष्ट्रनिष्ठा, कर्तव्य निष्ठ भावनेची ज्योती प्रत्येकाच्या मनात तेवत राहावी म्हणून शहीद पोलीस जवानांच्या स्मृतिप्रित्यर्थ दि. २१ ऑक्टोंबर हा दिवस संपूर्ण भारतभर पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो, या स्मृती दिन मानवंदनेसाठी मा श्री व्ही व्ही पाटील, प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधीश लातूर, पोलीस अधीक्षक, सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, पोलीस उप अधीक्षक गजानन भातलवंडे, उपस्थित होते. सर्व पोलीस अधिकारी अमलदारांनी स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन सलामीसह मानवंदना दिली.

यावेळी राखीव पोलीस निरीक्षक गफार शेख यांच्या नेतृत्वाखालील प्लाटूनने सलामी व शोक शस्त्र करून हवेमध्ये गोळ्यांच्या तीन फैरी झाडून शहिदांना मानवंदना दिली. यावेळी सूत्रसंचालन व शहिदांचे नाव वाचन सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील व महिला पोलीस उपनिरीक्षक हिना शेख यांनी केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील ४५ पोलीस अधिकारी व ३५० पोलीस अंमलदार उपस्थित होते.

# भाजपच्या पहिल्या यादीत आमदार भीमराव केराम यांना पुन्हा उमेदवारी

## किनवटमध्ये कार्यकर्त्यांत जल्लोष



किनवट/शेख शौकत :-दि. २० ऑक्टोबर ८३ किनवट विधानसभा मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाने विद्यमान आमदार भीमराव केराम यांना उमेदवारी जाहीर केली असून उमेदवारी जाहीर होताच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिजामाता चौकात फटाक्याची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. दरम्यान उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आमदार भीमराव केराम यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असता माझी उमेदवारी ही पक्षाने दिलेली विकासकार्याची पावती आहे असे त्यांनी सांगितले. फ्किनवट विधानसभेसाठी भारतीय जनता पक्षाकडून डझनभर नेते इच्छुक होते परंतु आमदार भीमराव केराम यांच्याशिवाय इतर कोणालाही उमेदवारी मिळणार नाही हे सर्वश्रुत होते. केंद्रीय कमिटीने महाराष्ट्रातील अनेक उमेदवारांची नावे जाहीर केले असून त्यात ८३ किनवट विधानसभा मतदारसंघासाठी विद्यमान आमदार भीमराव केराम यांच्या नावाचा समावेश आहे. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भीमराव केराम यांनी भारतीय जनता पक्ष प्रणित शिवसंग्राम पक्ष कडून परंतु कमळ चिन्हावर निवडणुक लढवून विजय प्राप्त केला. आमदार म्हणन त्यांनी कमी कालावधीत अंदाजे ४ हजार कोटी रुची अभूतपूर्व विकास कामे केली. पक्षनिष्ठा आणि विकास कार्याची दखल घेऊन भाजप श्रेष्ठीने पुन्हा एकदा त्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान त्यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून प्रतिक्रिया जाणून घेतल्या असता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली मी प्रामाणिकपणे काम केले. पक्षश्रेष्ठीने मला उमेदवारी देऊन माझ्या विकास कार्याची पावती दिली असल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभेसाठी संधी दिल्याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह केंद्रीय नेत्यांचे आभार व्यक्त केले. भीमराव केराम यांच्या यांच्या उमेदवारीचे वृत्त कळताच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यात नवा जोश संचारला असून जिजामाता चौकात शेकडो कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी जल्लोष साजरा केला आहे. करून

# लातूर शहर येथून गौसोद्दीन शेख यांना विधानसभेसाठी स्वराज शक्ती सेनेच्या वतीने उमेदवारी जाहीर

लातूर :- लातूर शहर हा अल्पसंख्यांक बहुल असून या ठिकाणी अनेक वर्षापासून विविध माध्यमातून व पत्रकारितून तळागाळातील लोकांसाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारा ढाण्या वाघ गौसोदीन उस्मान शेख यांचा मागील अनेक वर्षापासून केलेल्या निस्वार्थ समाजसेवेचा अहवाल व जनसेवा पाहून स्वराज शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सो करुणाताई मुंडे यांनी लातूर शहर येथून येणाऱ्या विधानसभेसाठी शेख यांना उमेदवारी जाहीर केली आहे गौस उद्दीन शेख हे मूळ उदगीर या शहरातून येतात त्यांनी २०१९ स औसा विधानसभा लढवलेली आहे तसेच लातूरची पहिली महानगरपालिका जेव्हा अमलात आली तेव्हा नगरसेवक म्हणून त्यांनी निवडणूक लढवली अशा अनेक निवडणुका चा त्यांना भक्कम अनुभवा अभ्यास असल्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन अशा जनसेवकाला जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी विधानसभेमध्ये पाठवण्यासाठी लातूर शहर येथून त्यांना विधानसभेचा उमेदवार घोषित केला आहे.



# भाजपमध्येही राजकीय 'घराणेशाही'

पुणे : प्रतिनिधी भारतीय जनता पक्ष हा विचारांवर चालणारा पक्ष असल्याचा दावा केला जातो. भाजपच्या त्यांच्या काही विचारधारा असून काही परंपरांना त्यांचा तीव्र विरोध आहे. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ९९ उमेदवार घोषित केले आहेत. यामध्ये बहुतांशी उमेदवार विद्यमान आहेत तर काही नवीन चेह-यांचे राजकारणाशी कौटुंबिक संबंध आहेत. आधी घराणेशाहीला विरोध करणा-या भाजपमध्ये आता सर्रास राजकीय घराणेशाही परंपरा सुरू झाली आहे.

दरम्यान, भाजपला केंद्रामध्ये सत्तेवर येऊन तब्बल तीन टर्म झाली आहेत. मागील अनेक वर्षे भाजप राज्यामध्ये देखील सत्तेवर आहे. उद्धव ठाकरेंच्या मंत्रिपदाचा कार्यकाळ सोडला तर भाजप २०१४ नंतर सत्तेवर आहेच. केंद्रासह आता राज्यामध्ये भाजपमध्ये राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांना किंवा जवळच्या व्यक्तींना उमेदवारी देण्यास सुरुवात झाली आहे.

आधी काँग्रेस सरकारच्या काळामध्ये भाजपकडून घराणेशाहीच्या मुद्यावर जोरदार टीकास्त्र डागण्यात आले. राजकारणातील घराणेशाही संपवण्यासाठी भाजप आहे, असे देखील भाजपकडून सांगण्यात येत होते. आता मात्र महाराष्ट्रामध्ये भाजपने घराणेशाहीची परंपरा सुरू केल्याचे दिसून येत आहे. भाजपच्या पहिल्याच यादीमध्ये अशा कौटुंबिक चेह-यांना संधी देण्यात आली आहे.

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे यांना उमेदवारी देण्यता आली आहे.

# रोटरी मिडटाऊनच्या शिबिरात ३०६ मुलींची रक्त तपासणी

लातूर/प्रतिनिधी: रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व भारत विकास परिषदेची सिद्धेश्वर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय महिला तंत्रनिकेतन येथे आयोजित आरोग्य शिबिरात ३०६ मुलींची रक्त तपासणी करण्यात आली.

शिबिराच्या उद्घाटन सत्रास शासकीय महिला तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. बकवाड यांच्यासह रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊचे अध्यक्ष चेतन पंढरीकर,सचिव गिरीश पेन्सलवार,भारत विकास परिषदेच्या सिद्धेश्वर शाखेचे अध्यक्ष सीए जगदीश तोष्णीवाल, सचिव राजन अयाचित, मार्गदर्शक डॉ.मंगेश कुलकर्णी,कार्यक्रम प्रमुख विशाल अयाचित,किशोर दाताळ,बालाजी बिरादार,सर्वोत्तम कुलकर्णी,अजय सुळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.मंगेश कुलकर्णी यांनी थॅलिसिमिया या आजाराबाबत मार्गदर्शन केले.यावेळी महिला तंत्रनिकेतन मधील ३०६ मुलींची रक्त तपासणी करण्यात आली. तंत्रनिकेतील मधील मुलींना विविध आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास महिला तंत्रनिकेतन मधील सर्व विभाग प्रमुख,शिक्षक आणि विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE